# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

एप्रिल–मे २०२१ च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा कालावधी दिनांक २८/११/२०२० पासून ते दिनांक १०/०२/२०२१ पर्यंत निश्चित करण्यात आला होता. याबाबत आपणास सूचित करण्यात येते की, खाजगीरित्या इयत्ता १०वी व इयत्ता १२ वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या अंतिम तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा.अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**१. इ.१०वी व इ.१२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या** अतिविलंबाच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | **माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी अतिविलंब शुल्क प्रती विद्यार्थी रुपये २०/- प्रतिदिन स्विकारुन विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इयत्ता १०वी व १२वी)** |
|---|---|
| १ | शुक्रवार दिनांक ०९/०४/२०२१<br>ते<br>रविवार दिनांक ११/०४/२०२१ |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ–** **इ.१० वी – http://form17.mh-ssc.ac.in**

**इ.१२ वी – http://form17.mh-hsc.ac.in**

४. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. **विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (compulsory) आहे.**

६. विभागीय मंडळांनी अर्ज स्विकारताना त्यावर SUPER LATE FORM शेरा पाहूनच अर्ज स्विकारावेत. विभागीय मंडळास प्राप्त झालेल्या सर्व फॉर्म १७ ची तपासणी दि. १६/०४/२०२१ अखेर पूर्ण करावी व त्यातील पात्र/अपात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करुन राज्य मंडळाकडे On Line शाखेस Portal : http://division.mh-ssc.ac.in व E-mail : stateboardonline@gmail.com या ई-मेल वर दि. १७/०४/२०२१पर्यंत सादर करावी.

७. पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षेची आवेदनपत्रे संबंधित शाळा/कनिष्ठ विद्यालयामार्फत त्वरित परीक्षेपूर्वी समक्ष विभागीय मंडळात अति विशेष अति विलंब शुल्कासह सादर करणे आवश्यक राहील.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे- ०४.

दि.०८/०४/२०२१